नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २९५ | Issue - 295 | वार गुरुवार दि. १३ मार्च २०२५ | Blow- Thursday Date 13 March 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...



### अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिकांना प्रोत्साहन भत्ता

मुंबई : 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे अर्ज भरणाऱ्या अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिकांना प्रति अर्ज ५० रुपये प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली असून निधी वितरणाची प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर सुरू असल्याची माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य रोहित पवार आणि वरूण देसाई यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी अंगणवाडी सेविकांना व पर्यवेक्षिका यांनी पात्र उमेदवारांचे अर्ज भरले होते. त्यांना प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी ३१.३३ कोटी रुपये इतका निधी वितरित करण्यात आला आहे. या भत्त्याच्या वितरणाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे आणि लवकरच अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिकांना लाभ मिळेल असे मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत सांगितले.

### प्रशासकीय कामकाजात ई-ऑफिस प्रणाली बंधनकारक

मुंबई : राज्यातील शासकीय कामकाज अधिक लोकाभिमुख, गतिशील आणि पारदर्शक होण्यासाठी १ जानेवारी २०२५ पासून ई-ऑफिस प्रणालीद्वारे कामकाज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींमध्ये देखील ही प्रणाली लागू केली जाणार आहे, अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य मोहन मते, संतोष बांगर यांनी यासंदर्भात सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री गोरे म्हणाले, ई-ऑफिस प्रणालीची अंमलबजावणी यशस्वी करण्यासाठी संगणक, इंटरनेट जोडणी, अखंडित वीजपुरवठा आणि संबंधित कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण देण्याची प्रक्रिया सुरू आहे. ग्रामस्तरापर्यंतही ही प्रणाली लवकरच कार्यान्वित केली जाईल. आत्तापर्यंत ई-ऑफिस प्रणालीद्वारे ३ लाख ५५ हजार पेक्षा अधिक फाईली तयार करण्यात आल्या आहेत. ग्रामविकास विभागांतर्गत ग्रामपंचायत आणि पंचायत समिती स्तरावरही लवकरच ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित करण्यात येईल, असे मंत्री गोरे यांनी विधानसभेत सांगितले.

# एमपीएससीच्या सर्व परीक्षा मराठीत होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधान परिषदेत माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सध्या सुरू असलेले राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन विविध मुद्द्यांनी गाजत आहेत. अशात आज विधान परिषदेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामधील विविध विषयांवरही चर्चा झाल्याचे पाहायला मिळत आहे. आज विधानपरिषदेचे सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी एमपीएससीच्या परीक्षा मराठीत घेण्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. आमदार नार्वेकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमपीएससीच्या सर्व स्पर्धा परीक्षा मराठीत घेण्याची राज्य सरकारची योजना असल्याचे स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्र्यांनी याबाबत एक्सवरही पोस्ट करत माहिती दिली आहे.





देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत एक्सवर पोस्ट करत म्हटले की, विधानपरिषद सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी एमपीएससीच्या परीक्षा मराठीत घेण्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. सध्या अभियांत्रिकी आणि कृषी तांत्रिक पदांच्या परीक्षा इंग्रजीत घेतल्या जातात, कारण संबंधित पुस्तके मराठीत उपलब्ध नाहीत. मात्र, आता अभियांत्रिकी शिक्षण मराठीत घेण्यास परवानगी मिळाल्याने लवकरच या अभ्यासक्रमाची पुस्तके मराठीत उपलब्ध होतील. त्यानुसार, सर्व तांत्रिक पदांच्या परीक्षा मराठीत घेण्याचे नियोजन राज्य शासनाने केले आहे.

याचबरोबर आज विधानपरिषदेचे सदस्य सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, भाई जगताप, जयंत आसगावकर, राजेश राठोड, धीरज लिंगाडे, डॉ. प्रज्ञा सातव, मिलिंद नार्वेकर, सुनिल शिंदे यांनी एमपीएससी संदर्भात विविध प्रश्न उपस्थित केले होते. यावेळी एमपीएससीमार्फत होणारी पदभरती आणि पारदर्शकता व पेपरफुटीवरही प्रश्न विचारण्यात आले होते. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तरे दिली आहेत.

यावेळी, शासनाने रिक्त पदे भरण्यासाठी घोषणा करुनही १५ पेक्षा जास्त विभागात भरती प्रक्रिया राबविण्यात आली नाही, तसेच तलाठी व जिल्हा परिषदेची भरती प्रक्रिया राबविल्यानंतर उमेदवार पात्र होऊनही त्यांना नियुक्तीचे पत्र दिले नाही, हे ही खरे आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. - याला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, तलाठी तसेच जिल्हा परिषदेतील पदे ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जात नाहीत. तसेच नियुक्ती पत्र देण्याची कार्यवाही देखिल आयोगामार्फत केली जात नाही. त्यामुळे या विषयाचा आयोगाच्या मनुष्यबळाशी कोणताही संबंध नाही.

# सोलापूरजवळ विहिरीत पडून विवाहितेसह दोन मुलांचा मृत्यू

सोलापूर : उत्तर सोलापूर तालुक्यातील वांगी गावात एका विहिरीत एका महिलेसह तिच्या दोन मुलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. बुधवारी दुपारी बाराच्या सुमारास ही दुर्घटना घडली. चित्रा बाळासाहेब हाक्के (वय २८) व तिची मुले पृथ्वीराज (वय ५) आणि स्वराज (वय २) अशी या दुर्घटनेतील दुर्दैवी मायलेकांची नावे आहेत. चित्रा हाक्के ही वांगी गावात कुटुंबीयांसह राहात होती. ती आपल्या दोन्ही मुलांसह विहिरीकडे कशासाठी गेली होती ? हा प्रकार आत्महत्येचा की अपघाती, हे स्पष्ट झाले नाही. सोलापूर तालुका पोलीस या घटनेचा



अधिक तपास करीत आहेत. गेल्या आठवड्यात सांगोला तालुक्यातील डिकसळ गावात एका विवाहित महिलेने आपल्या दोन्ही चिमुकल्या मुलांना विहिरीत टाकून नंतर स्वतः विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली होती. त्यानंतर उत्तर सोलापूर तालुक्यात हा प्रकार घडला आहे.

# किरकोळ महागाई दर ३.६१ टक्क्यांवर; रिझर्व्ह बँकेस एप्रिलमध्ये व्याजदर कपातीस वाव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भाज्या आणि प्रथिनेयुक्त वस्तूंच्या किमती घटल्यामुळे सरलेल्या फेब्रुवारीमध्ये किरकोळ महागाई दर ३.६१ टक्क्यांपर्यंत नरमला असून, रिझर्व्ह बँकेच्या अपेक्षेप्रमाणे सहनशील पातळीपर्यंत ही नरमाई येत्या एप्रिलमध्ये व्याज दरात दुसऱ्या कपातीस पूरक ठरेल, अशी आशा आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ महागाई दर सरलेल्या फेब्रुवारीत सात महिन्यांच्या नीचांकी पातळीवर दिलासादायी घसरण झाली आहे. या आधी जानेवारीत तो ४.२६ टक्के, तर गेल्या वर्षी फेब्रुवारी २०२४ मध्ये ५.०९ टक्के पातळीवर होता. फेब्रुवारी २०२५ मध्ये वार्षिक सरासरी चलनवाढीचा दर ३.७५ टक्क्यांवर गडगडला आहे.

जानेवारी २०२५ च्या तुलनेत फेब्रुवारी २०२५ मध्ये खाद्यान्न महागाईत २२२ आधारबिंदूंची तीव्र घट दिसून आली आहे. फेब्रुवारीमधील खाद्यान्न महागाईची पातळी



ही मे २०२३ नंतरची सर्वात कमी पातळीवर आहे. फेब्रुवारीत प्रमुख चलनवाढ (कोअर इन्फ्लेशन) आणि अन्नधान्याच्या महागाईत लक्षणीय घट झाल्याचे राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने म्हटले आहे. भाज्या तसेच प्रथिनेयुक्त आहार असलेल्या अंडी, मांस आणि मासे, डाळी आणि उत्पादने, दूध आणि उत्पादनांच्या महागाईत घट झाल्यामुळे महागाईत तीव्र घसरण झाली आहे. किरकोळ महागाईदर ४ टक्क्यांच्या पातळीवर मर्यादित ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक प्रयत्नशील आहे. गेल्या महिन्यात महागाईच्या आघाडीवरील चिंता कमी झाल्या कारणाने तिने अल्पकालीन कर्ज दर (रेपो) २५ आधारबिंदूंनी कमी केला आहे. त्यामुळे पुढील महिन्यात ९ एप्रिल रोजी पुढील द्वैमासिक पतधोरण आढाव्याच्या बैठकीत तिचा पवित्रा काय राहिल, याबाबत आता उत्सुकता आहे.

# शक्तीपीठ महामार्ग शेतकऱ्यांच्या सहकार्याने पूर्ण करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य सरकारला 'शक्तीपीठ महामार्ग' पूर्ण करावयाचा आहे. पण, हा महामार्ग शेतकऱ्यांवर लादायचा नाही. ज्या शेतकऱ्यांचा विरोध आहे, त्यांच्या तक्रारी, अडचणी ऐकून घेऊन अडचणी सोडविल्या जातील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे शक्तीपीठ महामार्गाचा प्रश्न उपस्थित केला. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी शक्तीपीठ होणार नाही, अशी घोषणा कोल्हापूरमध्ये केली होती. तरीही पुन्हा शक्तीपीठ महामार्गाची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे राज्य सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी त्यांनी केली. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,

**मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती; तक्रारी दूर करण्याला प्राधान्य**

शासनाला शक्तीपीठ महामार्ग करायचा आहे. पण, तो शेतकऱ्यांवर लादायचा नाही. मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासह मी कोल्हापूर विमानतळावर गेलो असता सुमारे एक हजार शेतकऱ्यांनी शक्तीपीठ महामार्ग व्हावा, अशी मागणी करणारे निवेदन मला दिले होते. त्यातील एकही शेतकरी खोटा नाही, खोटा असल्यास कारवाई करावी, असेही शेतकऱ्यांनी म्हटले होते. शेतकऱ्यांनी शक्तीपीठाला जागा देण्यास सहमती दिली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सहमतीचे निवेदन मला दिलेले आहे.

शक्तीपीठ केवळ श्रद्धेचा विषय नाही. मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांसह विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांच्या विकासासाठी शक्तीपीठ महामार्ग पूर्ण केला जाणार आहे. महामार्ग ज्या जिल्ह्यांतून जाणार आहे, त्या जिल्ह्यांचा वेगाने विकास होणार आहे. कोल्हापूरमधून पाऊण तासात मोपा (उत्तर गोवा) विमानतळावर जाता येणार आहे. जमिनीच्या चार-पाच पट भाव मिळतो, त्यामुळे शेतकरी जमिनी देण्यास तयार होत आहेत. रस्ते विकासाचे मार्ग आहेत. समृद्धी, शक्तीपीठ आणि कोकण महामार्गामुळे राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला विमानतळ, बंदरांशी जोडले जाणार आहे. दळणवळणाच्या सोयी वाढणार आहेत. शक्तीपीठ महामार्ग आमचा अट्टहास नाही. आझाद मैदानावर आज शक्तीपीठाच्या विरोधात मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चाला उपस्थित असणाऱ्या शेतकऱ्यांच्या तीन पट शेतकऱ्यांच्या उपस्थितीत शक्तीपीठाला समर्थन असणाऱ्या शेतकऱ्यांचा मेळावा आयोजित केला जाणार आहे. माजी मंत्री, काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी मध्यस्थी करावी, शेतकऱ्यांच्या अडचणी ऐकून घेऊन



त्यावर मार्ग काढू. शेतकऱ्यांच्या सहमतीने महामार्ग पूर्ण करू, असेही फडणवीस म्हणाले.

सरकारला महामार्गासाठी एक इंचही मोजणी करू देणार नाही. जबरदस्तीने मोजणी केल्यास पळवून लावू, असा इशारा शक्तीपीठ विरोधी नेत्यांनी दिला. राज्यातील शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारा शक्तीपीठ महामार्ग होऊ देणार नाही. काहीही झाले तरी शेवटपर्यंत एकजुटीने लढू असा, निर्धार १२ जिल्ह्यांतील बाधित शेतकऱ्यांनी आझाद मैदानावर केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जयंत पाटील, आमदार कैलास पाटील, प्रवीण स्वामी, सचिन अहिर आदींनी मोर्चाला उपस्थित राहून समर्थन दिले. शक्तीपीठ विरोधी संघर्ष समितीचे निमंत्रक गिरीश फोंडे, राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

## मंदिर समितीची सभा संपन्न; सुरु असलेली कामे ५ जून पुर्वी पुर्ण करावीत

## सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या सुचना

# श्रींच्या गाभाऱ्यातील दगडी कामाच्या कोटींगसाठी पुरातत्व विभागाने लेखी अहवाल द्यावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन, संवर्धन व जिर्णोद्धाराचे काम पुरातत्व विभागामार्फत सुरू असून, सदर कामाच्या अनुषंगाने श्रींच्या गाभाऱ्यातील दगडी कामाच्या कोटींगसाठी पुरातत्व विभागाने मंदिर समितीस तात्काळ लेखी अहवाल सादर करावा तसेच सध्या सुरू असलेली कामे आषाढी यात्रे पूर्वी म्हणजे ५ जून पूर्वी पूर्ण करावीत अशा पुरातत्व विभागास सुचना करण्यात आल्या तसेच टोकन दर्शन प्रणालीची चाचणी घेण्याबाबत टिसीएस कंपनीच्या प्रतिनिधी बरोबर चर्चा करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

मंदिर जतन, संवर्धन कामाचा तसेच टोकन दर्शन प्रणाली सुरू करण्याबाबत टिसीएस कंपनीच्या प्रतिनिधी बरोबर चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. तथापि, काही अपरिहार्य कारणास्तव सदरची बैठक रद्द करण्यात आली.

तथापि, आज दिनांक ११ मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, पंढरपूर येथे सह अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली मंदिर जतन व संवर्धन




तसेच टोकन दर्शन प्रणालीची चाचणी घेण्याबाबत आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीस डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), ॲड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, डॉ.विलास वाहणे, सहायक संचालक, पुरातत्व विभाग पुणे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे तसेच जतन व संवर्धन कामाचे ठेकेदार व टिसीएस कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये तिरूपती , शिर्डी देवस्थानच्या धर्तीवर टोकन दर्शन प्रणाली सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. त्याची चाचणी घेण्याचा आढावा घेण्यात आला. त्याबाबत उपविभागीय अधिकारी सचिन इतापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जून भोसले, पोलीस निरीक्षक विश्वजित घोडके व पटवारी यांचेशी चर्चा करण्यात आली.

टोकन दर्शन प्रणालीच्या चाचणीचे तीन टप्पे करण्यात आले असून, कमीत कमी गर्दीच्या दिवशी पहिली चाचणी, नंतर मध्यम गर्दीच्या दिवशी दुसरी व महिन्याच्या एकादशीच्या दिवशी तिसरी अशा एकूण तीन चाचण्या घेण्यात येणार असून, या प्रणालीत कोणत्याही प्रकारची त्रुटी राहणार नाही याची दक्षता घेऊन भाविकांना सुलभ व जलद दर्शन उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

मंदिर जतन व संवर्धन आराखड्याअंतर्गत सध्या सुरू असलेली कामांश्रींचा गाभारा, बाजीराव पडसाळी, सभामंडप व इतर अनुषंगीक ठिकाणची कामे ५ जून पूर्वी पूर्ण करणे तसेच श्री विठ्ठल गाभारा व श्री रूक्मिणी गाभारा येथील दगडी कामास कोटींग करण्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना राबविण्याबाबत पुरातत्व विभागास लेखी अहवाल देण्याच्या सुचना करण्यात आल्या.

याशिवाय, मंदिरातील फायर फायटींग व इलेक्ट्रीक कामाची ई निविदा अंतिम झाली असून, त्याचे काम देखील आषाढी पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करणे इत्यादी निर्णय बैठकीत घेण्यात आल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### महागाईची चिंता

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ महागाई दर सरलेल्या फेब्रुवारीत सात महिन्यांच्या नीचांकी पातळीवर दिलासादायी घसरण झाली आहे. या आधी जानेवारीत तो ४.२६ टक्के, तर गेल्या वर्षी फेब्रुवारी २०२४ मध्ये ५.०९ टक्के पातळीवर होता. फेब्रुवारी २०२५ मध्ये वार्षिक सरासरी चलनवाढीचा दर ३.७५ टक्क्यांवर गडगडला आहे. भाज्या आणि प्रथिनेयुक्त वस्तूंच्या किमती घटल्यामुळे सरलेल्या फेब्रुवारीमध्ये किरकोळ महागाई दर ३.६१ टक्क्यांपर्यंत नरमला असून, रिझर्व्ह बँकेच्या अपेक्षेप्रमाणे सहनशील पातळीपर्यंत ही नरमाई येत्या एप्रिलमध्ये व्याज दरात दुसऱ्या कपातीस पूरक ठरेल, अशी आशा आहे. जानेवारी २०२५ च्या तुलनेत फेब्रुवारी २०२५ मध्ये खाद्यान्न महागाईत २२२ आधारबिंदूंची तीव्र घट दिसून आली आहे. फेब्रुवारीमधील खाद्यान्न महागाईची पातळी ही मे २०२३ नंतरची सर्वात कमी पातळीवर आहे. फेब्रुवारीत प्रमुख चलनवाढ (कोअर इन्फ्लेशन) आणि अन्नधान्याच्या महागाईत लक्षणीय घट झाल्याचे राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने म्हटले आहे. भाज्या तसेच प्रथिनेयुक्त आहार असलेल्या अंडी, मांस आणि मासे, डाळी आणि उत्पादने, दूध आणि उत्पादनांच्या महागाईत घट झाल्यामुळे महागाईत तीव्र घसरण झाली आहे. किरकोळ महागाईदर ४ टक्क्यांच्या पातळीवर मर्यादित ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक प्रयत्नशील आहे. गेल्या महिन्यात महागाईच्या आघाडीवरील चिंता कमी झाल्या कारणाने तिने अल्पकालीन कर्ज दर (रेपो) २५ आधारबिंदूंनी कमी केला आहे. त्यामुळे पुढील महिन्यात ९ एप्रिल रोजी पुढील द्वैमासिक पतधोरण आढाव्याच्या बैठकीत तिचा पवित्रा काय राहिल, याबाबत आता उत्सुकता आहे.

# बंधुभाव व एकतेचे प्रतिक म्हणजे - होळी



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्राचीन भारतात होळी हा रंग, प्रेम आणि वसंत ऋतूचा सण म्हणून साजरा केला जाणारा लोकप्रिय आणि महत्त्वाचा हिंदू सण आहे. वसंत ऋतुच्या आगमनाप्रसंगी निसर्गाने अधिकच साजश्रृंगार केलेला असतो. फुललेल्या फुलाला कोमलतेचा बहार आलेला असतो. झाडं पाना-फुलांनी नववधुगत बावरुन गेलेली असतात आणि पक्षाचं आकाशात झुलायचं स्वप्नही साकार झालेलं असतं. निसर्गाच्या तारुण्याचे हिरवेपण पाहून माणसाचं मन बहरुन आनंदून आलेलं असतं. वसंतोत्सव हा कालांतराने होळी दहनाच्या रुपाने साजरा होऊ लागला. उत्सवाचं स्वरुप जरी बदललं तरी उद्देश धोरण तोच आहे. प्रसन्नता, आनंद, मस्ती या दिवसात मन उचंबळून आलेलं असतं. लहान मुलांना पीडा देणाऱ्या 'होलिका', 'ढुंढा', 'पुतना' ह्यांसारख्या राक्षसींच्या दहनांच्या कथांमधे ह्या उत्सवाच्या परंपरेचा शोध काही लोक घेतात. एका पौराणिक कथेनुसार भगवान विष्णूचा भक्त असलेल्या प्रल्हादाला मारण्यासाठी हिरण्यकश्यपूने धाडलेल्या होलिकादेवतेचा श्रीविष्णू देवाने वध केला होता. होलिकेला वर होता की तिला अग्नी जाळू शकणार नाही, परंतु प्रल्हादाला जाळण्यासाठी तिने त्याला मांडीवर घेऊन अग्निकुंडात प्रवेश केला. प्रल्हाद बचावला व होलिकेचे दहन झाले अशी आख्यायिका प्रचलित आहे. अशाप्रकारे हिंदूंच्या इतर सणाप्रमाणे होलिका दहन देखील वाईटावर चांगल्याचा विजयाचे चांगले प्रतीक आहे. कारण तो हिरण्यकश्यपूवर नरसिंहाच्या रूपात विष्णूच्या विजयाचे स्मरण करतो. वाईट गोष्टींवर विजय मिळवणे ही या सणाची व्याख्या आहे. या प्रकारे होळीची उत्पत्ती झाली आणि ती प्रामुख्याने भारतीय उपखंडात साजरी केली जाते.

होळी भारतात वसंत ऋतूचे आगमन, हिवाळ्याचा शेवट आणि प्रेमाचा बहर साजरी करते. हे वसंत ऋतु कापणीच्या चांगल्या हंगामासाठी देखील एक आवाहन आहे. हे एक रात्र आणि एक दिवस चालते, हिंदू पंचांग फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेच्या संध्याकाळी (पौर्णिमेचा दिवस) चालू होतो, जो इंग्रजीब ग्रेगोरियन कॅलेंडरमध्ये मार्चच्या मध्यभागी येतो. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण लोक आनंदाने साजरा करतात. या उत्सवाला 'होलिकादहन' किंवा 'होळी पौर्णिमा', 'शिमगा', 'हुताशनी महोत्सव', फाग, फागुन 'दोलायात्रा', 'कामदहन' अशा वेगवेगळ्या संज्ञा आहेत, ज्याला कोकणात शिमगो म्हणतात. फाल्गुन महिन्याच्या शेवटच्या दिवशी साजरा होणाऱ्या ह्या लोकोत्सवाला 'फाल्गुनोत्सव' आणि दुसऱ्या दिवशी सुरू होणाऱ्या वसंत ऋतूच्या आगमनानिमित्त 'वसंतागमनोत्सव' किंवा 'वसंतोत्सव' असेही म्हणण्यात येते. देशीनाममाला या ग्रंथात हेमचंद्र याने या सणाला सुग्रीष्मक असे नाव दिले आहे. यातूनच 'शिमगा' असा अपभ्रंश तयार झाला असावा असे मानले जाते.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

भारताचा सांस्कृतिक सण म्हणजे होळी ! अंतःकरणातील अपार प्रेमाने रंग गुलालाची उधळण करणारा. रंगोन्मादानं भारतीय मातीत अंर्तबाहय मस्ती भरणारा. प्रांत, भाषा व धर्माच्या विभिन्न रंगांच्या सरितांना राष्ट्रीय रंगस्थळीच्या त्रिवेणीत एकात्मतेच्या रंगानं प्रवाहित करणारा हा राष्ट्रीय सण. होळी-धुळीवंदन सणाला महाराष्ट्रात धामधुम, युवकांचा जल्लोष, मादक द्रव्यांचा सर्रास वापर व आहारी जात या सणाची सणसण समाजात पसरवितांना दिसतात. होळीच्या दिवशी राजा आणि प्रजा एक होऊन एकमेकांवर रंग उडवितात ते काय निदान वर्षाचे चार-पाच दिवस तरी समानतेचे तत्व अनुभवण्यासाठी? मानवी आरोग्यावर होणारे ऋतुचे परिणाम याचा संकेत देणारा सण आहे, निसर्ग आनंदाचा सण आहे. होळीमध्ये एकमेकांना विविध रंग लावून हा सण साजरा करतात. तसेच विविध पारंपरिक गाणी, पारंपरिक नृत्ये यामध्ये समाविष्ट असतात. बंजारा समाजामध्ये होळीला फार महत्त्व आहे. बंजारा समाजामध्ये, बंजारा भगिनी पारंपरिक पोशाखात नृत्य करतात. विशेषतः उत्तर भारतामध्ये उत्साहाने साजरा होणारा एक सण आहे. याला वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते.

भारताच्या निरनिराळया राज्यात निरनिराळया प्रकारे होळी करतांना दिसतात. परंतू होळी पेटविण्याचा प्रकार सर्वच ठिकाणी सारखाच होत असतो. महाराष्ट्रात शेणाच्या गोवऱ्यांची किंवा लाकडांची होळी करण्याची प्रथा आहे. कोकणपट्टीत सुपारीचे झाड, आंब्याचे किंवा इतर कुठल्याही झाडांचा सोट देवळापूढे रोवून त्यांच्या तळाशी लहान-लहान लाकडे व गवत जाळतात. इतर प्रदेशाच्या मानाने महाराष्ट्रातील कोकणपट्टीत या सणाला बरेच महत्व आहे. गोव्यात काही ठिकाणी वायंगणी शिमगा म्हणजे चैत्र शुक्ल पक्षात देखील घुमट (मडक्याचे वाद्य) वाजविले जावून जल्लोशात होळी सण साजरा करतांना आढळतात. होळी हा रंगाचा आणि कृषी संस्कृतीचे जतन करणारा सण आहे. शेतकरी वर्गात होळी या सणाचे खास महत्त्व आहे. पौराणिक इतिहास पाहता या सणाचे आणि कृष्ण-बलराम यांचे नाते दिसून येते. होळीच्या निमित्ताने या दोन्ही देवतांचे स्मरण आणि पूजा करतात. यादिवशी हाती आलेल्या पिकाबद्दल देवाला धन्यवाद देण्यासाठी प्रार्थना करतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी गव्हांच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याचीही प्रथा आहे. आदिवासी जमातीतील स्त्री-पुरुष हा दिवस गुलाल उधळून, टिमक्या-ढोल वाजवून, नृत्य करून उत्साहाने साजरा करतात. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील लोकांत होळी हा सण उत्साहाने साजरा केला जातो. होळी साजरा करत असतांना आदिवासी लोकांच्या भोजनामध्ये गोड पुरी, मासळी व गोड भात या पदार्थांचा समावेश असतो. सातपुडा पर्वत प्रदेशातील आदिवासी होळीच्या दरम्यान काठी उत्सव साजरा करतात. बाराव्या शतकापासून ही परंपरा सुरू असल्याचे दिसते. दागदागिने घालून, नक्षीकाम करून स्त्री-पुरुष यात सहभागी होऊन विविध वाद्यांच्या तालावर नृत्य करतात.

महाराष्ट्रात होळीच्या दिवशी समिधा म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळतात येतात आणि पेटलेल्या होळीभोवती 'बोंबा' मारत लोक प्रदक्षिणा घालतात. होळीला नारळ अर्पण करून नैवेद्य दाखवतात. महाराष्ट्रात पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्याची रीत आहे. होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदनाचा सण साजरा केला जातो. याला 'धुळवड' असेही म्हणतात. या दिवशी होळीची रक्षा अंगाला फासली जाते किंवा ओल्या मातीत लोळण घेतली जाते. होळीनंतर ५ दिवसांनी रंगपंचमी हा सण साजरा केला जातो. एकमेकांना गुलाल लावून रंगांची उधळण करणे, सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून याकडे पहिले जाते. होळी हा रंगाचा सण आहे, समस्त समुदाय होळीची विधियुक्त पूजा करतो. होळी समोर गाऱ्हाणे, नवस बोलण्याची परंपरा आहे. नागपूरकर भोसल्यांच्या वाड्यात व तसेच पेशवाईत खेळली जाणारी होळी आणि रंगपंचमी तर महाराष्ट्राच्या इतिहासात सुप्रसिध्दच आहे. स्वतंत्र भारतात होळीची प्रथा पंडित जवाहरलाल नेहरुंजी पण जोपासली, जपली ! प्रेम आणि आनंद पसरवणे आपण या सणाचा स्वीकार करत असताना, या मनःपूर्वक शुभेच्छांसह प्रेम आणि आनंद पसरवू या. या प्रसंगी सर्वांना सुरक्षित होळी आणि धुलीवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा !

## पडघा बस स्थानकाची अवस्था बिकट
## छताला बांबूचा आधार; प्रवाशांमधून नाराजीचा सूर



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : वाढत्या नागरीकरणामुळे शहराकडे वाटचाल करणाऱ्या भिवंडी तालुक्यातील पडघा बस स्थानकाची दुरवस्था झाली आहे. या स्थानकाच्या छताला बांबूचा आधार लावल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. तर पडघा बस स्थानकातील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पडघा परिसरातील खेड्यापाड्यांमध्ये झालेल्या नागरीकरणामुळे व्यापारी केंद्र झाले आहे. विविध कामांसाठी हजारो नागरिक, चाकरमानी, विद्यार्थी बस स्थानकावरून प्रवास करतात. मुंबई व उपनगरात तर कल्याण, भिवंडी, वासिंद, शहापूर येथे जाण्यासाठी येथूनच प्रवास करतात. तसेच कल्याण, भिवंडी, शहापूर, खडवली या ठिकाणांसाठी बस सुटतात. सद्या उन्हाळाचे दिवस असल्याने प्रवाशांना उन्हाची झळ बसल्याने , उन्हापासून संरक्षण होण्यासाठी सावली मिळावी म्हणून बस स्थानकाचा आधार घेण्यासाठी बस स्थानकात बसावे लागते. परंतु पडघा बस स्थानकाची अवस्था बिकट असल्याने प्रवाशांमधून नाराजीचा सूर उमटत आहे.

## औसा खरेदी विक्री संघाच्या नूतन संचालकाचा गोंद्री येथे सत्कार



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

औसा : औसा तालुका शेतकरी खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध विजयी झालेल्या सर्व बिनविरोध विजयी झालेल्या सर्व नूतन संचालकाचा तालुक्यातील गोंद्री येथे सत्कार सोहळा पार पडला.

याप्रसंगी क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष सूर्यवंशी, युवासेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, शहरप्रमुख सुरेश भुरे, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, बाजार समितीचे माजी उपसभापती किशोर जाधव, माजी तालुकाप्रमुख संजय उजळंबे, विधानसभा संघटक श्रीराम कुलकर्णी, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष सलीम पटेल, शिवाजी हांडे, महादेव पाटील, गणेश जाधव, हिप्परसोगा सरपंच मनोज सोमवंशी, श्रीधर सांळुके, नंदकुमार सांळुके, नवनाथ लवटे, केशव डांगे, बालाजी धुमाळ, राजेंद्र साळुंके, शाहूराज जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी श्रीहरी काळे, नारायण भोसले, हंसराज लंगर, महेश लंगर, संदीपान कांबळे, सत्तार ढालाईत, विलास पाटील, विलास लंगर, हजीर ढालाईत, केशव माळी, नरहरी काळे, धनराज कदम, अमर भोसले, मुस्ताक शेख, महताब ढालाईत विठ्ठल कांबळे, उध्दव लंगर, भागवत लंगर, सुभाष लंगर यांनी परिश्रम घेतले.

यावेळी बोलताना औसा तालुका खरेदी विक्री संघाचे संस्थापक तथा शिवसेना जिल्हाप्रमुख संतोषभाऊ सोमवंशी म्हणाले की, औसा तालुका तसेच जिल्ह्यातील शेतकर्यांच्या हितासाठी सतत प्रयत्न करीत राहू. औसा तालुका खरेदी-विक्री संघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना तूर, हरभरा अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. तसेच हमीभावाने शेतीमाल खरेदी करून तालुक्यातील शेतकऱ्यांना मदत केली, असे यावेळी सोमवंशी म्हणाले.

## सुनील भीमराव माने यांची अतिरिक्त मुख्य दंडाधिकारी व दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तरावर नियुक्ती


दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

टाकळीवाडी/प्रतिनिधी : मु.पो.शिरटी तालुका शिराेळ गावचे भाचा तसेच मु.पो. तेरवाड तालुका शिरोळ गावचे सुपुत्र मा.श्री. सुनील भीमराव माने यांची अतिरिक्त मुख्य दंडाधिकारी व दिवाने न्यायाधीश वरिष्ठ स्तरावर यांची नियुक्ती झाली.

समस्त चर्मकार समाजाच्या वतीने यांचा सत्कार करण्यात आला. तसेच शिरटी तालुका शिरोळ या गावी भव्य मिरवणूक काढण्यात आली.

एवढ्या मोठ्या पोस्टवर नियुक्ती झाल्याबद्दल सर्व चर्मकार बांधवांनी आनंद व्यक्त केला. त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी प्रमुख उपस्थित रावसाहेब निर्मळे अर्जुन धुमाळे (समाजसेवक), नागेश शेजाळे रामदास भंडारे, नारायण आगवने कार्यक्रमाचे आयोजन प्रकाश भंडारे. अरुण भंडारे. पांडुरंग भंडारे. पुंडलिक भंडारे. श्रीकांत भंडारे. सागर भंडारे. नाईक भंडारे तसेच समस्त चर्मकार शिरटी चर्मकार समाज बांधव ग्रामस्थ मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.



# भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकारामुळेच देशाच्या उच्च पदावर महिला अधिकारी विराजमान झालेल्या आहेत : ॲड. प्रज्ञेश सोनावणे




दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : पूर्वी चूल आणि मूल यातच महिलांचे जीवन व्यतीत करीत होते. परंतु २६०० वर्षे पूर्वी तथागत सम्मासंम्बुद्ध यांनी सर्वप्रथम महिलांना समानतेचा अधिकार देऊन समस्त महिला वर्गाला स्वातंत्र्याचा अधिकार मिळवून दिले असे प्रतिपादन ॲड. प्रज्ञेश सोनावणे यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त जेतवन बुद्ध विहार प्रतिक्षा नगर सायन येथे ०८ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ०७:०० वाजता, भारतीय संविधानातील महिलांचे अधिकार या विषयावर मार्गदर्शन ड प्रज्ञेश चैतन्य सोनावणे यांनी संविधानातील मूलभूत अधिकार तथा अनुच्छेद यांचे सविस्तर माहिती सांगितले.

पुढे ॲड. प्रज्ञेश सोनावणे म्हणाले की, महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीमाई फुले ह्या दापत्यांनी स्त्री शिक्षणाचा वसा घेतला नसता तर स्त्रियांची काय अवस्था झाली असती.

त्याच बरोबर संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी पुरुषांप्रमाणे स्त्रियांना सुद्धा समानतेचा अधिकार मिळवून देऊन समस्त महिला वर्गाला स्वातंत्र्याचा जाहीरनामाच दिला आहे, त्यामुळे आज भारतातील महिला मोठमोठ्या पदावर विराजमान झालेल्या आहे ही देण भारतीय संविधानाची आहे.

अमेरिका, रशिया, ब्रिटन ऑस्ट्रेलिया देशात संविधान तयार झाले तरी तिथल्या महिलांना मताचा अधिकार दिले नाही तिथे महिलांना मोठा लढा उभा करावा लागला तेव्हा त्यांना मताचा अधिकार मिळाला, परंतु भारतात संविधान निर्माण होतात, भारतीय महिलांना मताचा अधिकार मिळवून देण्यासाठी कोणता मोर्चा, आंदोलने करावी लागली नाही त्यामुळे जेव्हा संविधान अंमलात आल्यावर पुरुषांप्रमाणे स्त्रियांना सुद्धा मताचा अधिकार मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांना घडवणाऱ्या मांसाहेब जिजाऊ यांनी सती जाण्यास त्याकाळात विरोध करून खऱ्या अर्थाने महिलांच्या सामाजिक स्वातंत्र्याला उभे करण्याचे प्रयत्न केले होते.

हिंदू कोड बिल हे भारतीय महिलांचे स्वातंत्र्याचा जाहीरनामाच आहे. त्यात पोटगी, घटस्फोट, पूनर्विवाह, वडिलांच्या संपत्ती मध्ये समान हिस्सा या सारखे हक्क मिळवून देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समस्त भारतीय महिलांवर मोठे उपकारच केलेले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी नंदनाताई कांबळे होत्या तर कार्यक्रमाचे सूत्र संचालन सरिता उत्तम जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन सारिका संदेश पवार.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सायली भानुदास जाधव, हेमलता दिनेश सोनवणे, प्रमिला मिलिंद जाधव, सुचिता कांबळे, सुजाता जाधव, अस्मिता ताई, ऋणाली ढवळे, दर्शना खोब्रागडे, राधिका भोजने, विद्या लोखंडे, समीक्षा भोजने, मनीषा गांगुर्डे, पूजा रुपवते यांनी अथक मेहनत घेतली आणि सर्व महिला मंडळ यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला तसेच जेतवन सामाजिक प्रतिष्ठान कार्यकारणी आणि सभासद उत्तम आढाव, अनिल नितनवरे, प्रा. प्रशांत साळवी, प्रविण भाऊ लोखंडे, संदेश पवार, भानुदास जाधव, राजू भोजने, आणि बाबू डेकोरेटर सर्व कार्यकारणी मंडळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# चैत्री यात्रा कालावधीत नदीपात्रात मुबलक व स्वच्छ पाणी राहील याची दक्षता घ्यावी

## प्रांताधिकारी अधिकारी सचिन इथापे; अतिक्रमण मोहिमेवर भर द्यावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : चैत्र शुध्द एकादशी ०८ एप्रिल २०२५ ला असून, यात्रा कालावधी दि. २ ते १२ एप्रिल आहे. या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. यात्रेत भाविक व वारकऱ्यांसाठी चंद्रभागेचे स्नान फार पवित्र मानले जाते.श्री विठ्ठल- रुक्मिणीमातेचे दर्शन घेण्यापुर्वी भाविक चंद्रभागा स्नान करतात. तसेच चैत्री यात्रेत कालावधीत चंद्रभागा नदीमध्ये कावडी स्नानासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. येणाऱ्या भाविकांना चंद्रभागाभागा नदी पात्रात पवित्र स्नान करता यावे. यासाठी संबधित विभागाने चंद्रभागा नदीपात्रात मुबलक व स्वच्छ पाणी राहील याची दक्षता घेवून नियोजन करावे अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

चैत्री यात्रा नियोजनाबाबत प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे बैठक घेण्यात आली. बैठकीस तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल



संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, पोलिस निरिक्षक विश्वजित घोडके, मंदीर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता जी.एस.भोळे यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, पंढरपुरात चैत्री यात्रा कालावधीत तीन ते चार लाख भाविक येतात. या यात्रेत भाविकांच्या आरोग्य सुरक्षेला व स्वच्छतेला प्राधान्य द्यावे. नगरपालिका प्रशासनाने शहरातील अतिक्रमणे तात्काळ काढावित. मुबलक स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा. नदीपात्रात कोणतेही खाजगी वाहने जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी. आवश्यक ठिकाणी बॅरेकेटींग करावे. दर्शनरांगेतील भाविकांना उन्हाचा त्रास जाणवू नये यासाठी मंदिर समितीने आवश्यक उपाययोजना कराव्यात. आरोग्य विभागाने तज्ञ डॉक्टरांसह वैद्यकीय पथकाची नेमणूक करावी. तसेच मुबलक औषधसाठा उपलब्ध राहील याबाबत नियोजन करावे. चैत्री यात्रा उन्हाळ्याच्या दिवसात असल्याने अन्न पदार्थ लवकर खराब होण्याची शक्यता असल्याने अन्न व औषध प्रशासनाने हॉटेल, उपवासाचे पदार्थ विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी करण्यासाठी पथकांची नेमणूक करावी. महावितरण विभागाने अखंडीत व सुरक्षित वीज पुरवठा करावा. प्रदक्षिणा मार्गावरील रोहित्रांना आवरण घालावे. आवश्यक ठिकाणी सूचना फलक लावावेत अशा सूचना प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या.

यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे यासाठी बोअरवेल, हातपंपाची पाणी तपासणी करण्यात येत आहे. स्वच्छतेसाठी जादा हंगामी स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. ६५ एकरमध्ये भाविकांच्या सुविधेसाठी पाणी, वीज, स्वच्छता आदी सुविधा उपलब्ध करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी प्रशांत जाधव यांनी सांगितले. यावेळी बैठकीत आषाढी यात्रेबाबतच्या नियोजनाचाही आढावा घेवून आवश्यक कामे तात्काळ सुरु करावीत अशा सूचनाही प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या.

### ऐन उन्हाळ्यात वागदरी गावावर जलसंकट

# वागदरी येथेल जलजीवन काम अर्धवट स्थितीत अधिकारी व ठेकेदार यांचे कामाकडे दुर्लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट / हणमंत घोदे : अक्कलकोट तालुक्याती वागदरी येथील जलजीवन काम चालू होऊन वर्ष होत आले पण पाइपलाईनचे काम अर्धवट करून ठेवण्यात आले. केंद्र सरकार प्रत्येक गावाला पाण्याची टंचाई होऊ नये म्हणून प्रत्येक गावासाठी जलजीवन ही योजना राबवत असून करोडो रुपये मंजूर केले असून अनेक गावात कामे मंजूर झाले आहेत त्याच प्रमाणे अक्कलकोट तालुक्यातील वागदरी हे उत्तर भागातील एक मोठे बाजार पेठ असलेले गाव असून वागदरी साठी केंद्र सरकारने पाण्याची समश्या भविष्यात होऊ नये म्हणून जलजीवन योजने अंतर्गत एक कोटी छप्पन लाख सत्याणऊ हजार नऊशे वीस (१,५६,९७९२० ) रुपये मंजूर केले असून कामाचे तांत्रिक मान्यता २९/४/२०२३ असून कामाचे वर्क आर्डर होऊन वर्ष उलटले पण पाइपलाइनचे काम सुरु करून अर्धवट सोडून देण्यात आले विद्यमान सरपंच श्री शिवानंद घोळसगाव यांनी अनेक वेळा ठेकेदार याना फोन वर संपर्क करण्याचे प्रयत्न केले असता ठेकेदार फोन उचलण्यास तयार नाहीत वागदरी ग्रामपंचायतीला विश्वासात न घेताच ठेकेदाराने पाइपलाइनचे काम चालू केले होते व नंतर तो अर्धवट सोडून दिले या बद्दल सरपंच हे अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटून जलजीवन काम अर्धवट सोडून दिले आहे ठेकेदारांना काम चालू करण्यास सांगा म्हणून विनंती केली आहे पण अधिकारी हे वागदारीच्या कामाकडे दुर्लक्ष करत आहेत सध्या उन्हाळा चालू असुन वागदरी गावाला आठ दिवसाला पाणी पुरवठा करण्यात येते पण जलजीवनचे काम एक महिन्यात पूर्ण झाल्यास दोन दिवसा आड पाणी पुरवठा होईल असं नागरिकांचे म्हणणे आहे. वागदरीचे सरपंच शिवानंद घोळसगाव हे पाणी पुरवठा अधिकारी याना पत्र लिहून सुद्धा कामाकडे दुर्लक्ष करत असून ठेकेदार यांना अधिकारी पाठीशी घालत आहेत असे वागदरी ग्रामस्थ मधे चर्चा सुरू आहे मूळ ठेकेदार हे सी एस पाटील मु पो आंबेवाडी जिल्हा सांगली असून सब ठेकेदार सूर्यकांत बिराजदार मु पो निबर्गी ता दक्षिण सोलापूर असून सब ठेकेदारच संपूर्ण काम पाहतात असे सरपंच यांनी उप अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग याना दिलेले पत्रात उल्लेख केले आहेत.

> **वागदरी येथे जलजीवन काम मंजूर होऊन वर्ष उलटले पण ठेकेदार पाईपलाईन काम अर्धवट सोडून दिले आहे मी सरपंचपदी निवड झाल्यापासून जलजीवन काम लवकर पूर्ण व्हावे म्हणून पाठपुरावा करत आहे ठेकेदार हे फोन उचलत नाहीत भेटत नाहीत पाणी पुरवठा अधिकारी यांना भेटून व पत्र देऊन सुद्धा जलजीवन कामाकडे दुर्लक्ष करून आहेत**
>
> **– शिवानंद घोळसगाव (सरपंच वागदरी)**



# अमोल मेरगळ व संतोष कुदळे एवढं आसत का राव उतानं... गाडगं भरलं की मुतानं

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे

इंदापूर पंचायत समितीमध्ये कार्यरत असलेले एकात्मिक बालविकास प्रकल्पाचे अधिकारी अमोल मेरगळ व कर्मचारी संतोष कुदळे यांनी संगणमताने का राजकीय हस्तक्षेपामुळे अंगणवाडी मदतनीस या निवड प्रक्रियेतून निवड झालेल्या ऋतुजा दादासाहेब सूर्यवंशी महिलेस १७ फेब्रुवारी २०२५ रोजी निवड पत्र देऊन २७ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांची निवड रद्द केली. या प्रकरणामुळे इंदापूर तालुक्यात एकच खळबळ उडाली असून याच्या पाठीमागे गौडबंगाल काय ? असाच प्रश्न तमाम इंदापूर वासियांना पडला आहे. सदर महिलेची निवड प्रक्रियेतून निवड होऊन सुद्धा सदर महिलेची निवड रद्द केली गेली यामध्ये कुठल्यातरी राजकीय नेत्याचा हस्तक्षेप तर नसेल ना असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

ऋतुजा सूर्यवंशी यांची निवड प्रक्रियेतून निवड झाल्यानंतर एकात्मिक बालविकास प्रकल्पाचे अधिकारी हे त्यांना २ लाख रुपयांची मागणी करत होते. परंतु सूर्यवंशी या महिलेच्या घरची परिस्थिती ही बेताची असल्याने त्यांना आर्थिक देवाण-घेवाण करता आली नाही. त्यामुळेच त्यांची झालेली निवड ही अपात्र केली. असा दावा सदर महिला ऋतुजा सूर्यवंशी यांनी पत्रकारांशी बोलताना केला आहे.

सदर प्रकरणात आपल्याला न्याय मिळावा म्हणून ऋतुजा सूर्यवंशी यांनी जिल्हा परिषद पुणे या ठिकाणी १८ मार्च रोजी उपोषण करण्याचा पवित्रा ठेवला आहे. अशा प्रकारचे निवेदन सुद्धा त्यांनी संबंधित प्रशासनाला दिले आहे. तसेच आपण न्यायालयात दाद मागणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

सदर प्रकरणात एकात्मिक बालविकास प्रकल्पाचे जे कोणी अधिकारी व कर्मचारी यामध्ये सहभागी असतील त्या सर्वांवरती कठोर कायदेशीर कारवाई व्हावी अशी ही मागणी निवेदनात करण्यात आली आहे. सदर प्रकरणाच्या गुणपत्रिकेवर एकात्मिक बालविकास उरुळी कांचनचे अधिकारी तसेच इंदापूर एकात्मिक बालविकास योजनेचे मुख्य सेविका एम.एम बाबर यांच्या प्रामुख्याने सह्या आहेत.

> **एकात्मिक बालविकास प्रकल्पाचे अधिकारी अमोल मेरगळ व कर्मचारी संतोष कुदळे यांच्या वरती कारवाई होणार का ?**

> **जर नोव्हेंबर २०२४ मध्येच सूर्यवंशी यांना तुमची निवड करता येणार नाही तुमच्यापेक्षा दुसऱ्या उमेदवारास गुण जास्त आहेत असे सुचवले होते तर मग १७ फेब्रुवारी २०२५ मध्ये सूर्यवंशी यांना नियुक्त पत्र कसे दिले गेले ? हा सर्वात मोठा प्रश्न सर्वांपुढे उभा राहतो. त्यामुळे या सदर मदतनीस निवड प्रक्रियेमध्ये काहीतरी गौडबंगाल आहे का काय ? असेच निदर्शनात येत आहे.**

प्रकल्प अधिकारी अमोल मेरगळ व कर्मचारी संतोष कुदळे यांचे स्पष्टीकरण...

लहान मुलगा मी झोपेत मुतलो असे सांगतो तसे स्पष्टीकरण अमोल मेरगळ यांनी आमच्याकडून अनावधानाने त्यांना नियुक्त पत्र देण्यात आले होते सांगीतले.

आम्ही कुठल्याही प्रकारची त्यांच्याकडे मागणी केली नाही. जो माणूस काम करतो तोच चुकतो. जो माणूस काम करत नाही तो कसा चुकेल. आम्ही सदर सूर्यवंशी यांना नोव्हेंबर २०२४ मध्येच कल्पना दिली होती की तुमचे काम होणार नाही.

निवड प्रक्रियेतून नियुक्त केलेल्या महिलेस आर्थिक देवाण-घेवणाच्या अभावी का राजकीय हस्तक्षेपामुळे अपात्र केल्याची जनतेत जोरदार चर्चा होत आहे. या अगोदर अनेक प्रकरणांमध्ये एकात्मिक बालविकास योजनेचे प्रकल्प अधिकारी अमोल मेरगळ व त्यांचे काही सहकारी चर्चेत राहिलेले आहेत.

# १७ मार्च रोजी सासवड येथे बुध्दगया महाबोधी महाविहार मुक्तीसाठी मूक मोर्चाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर : प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : बिहार बुध्दगया येथील जगभरातील बौध्द अनुयायांचे श्रध्दास्थान असलेल्या महाबोधी महाविहारांचा ताबा बुद्धं अनुयायांना देण्यात यावा या मागणीसाठी भिक्खू संघाच्या वतीने, सुरु असलेल्या आंदोलनाला जाहीर पाठींबा देण्यासाठी बुध्दगया महाबोधी महाविहार मुक्ती कृती समिती पुरंदर तालुका यांच्या वतीने, सासवड येथे सोमवार दि. १७ मार्च २०२५ रोजी सकाळी ठीक ११ - वाजता मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती महाबोधी महाविहार मुक्ती कृती समितीच्या वतीने देण्यात आली,



बुध्दगया येथील महाबोधी महाविहार १९४९ चा ट्रस्ट कायदा रद्द करण्यात येऊन, महाविहार बुध्द अनुयायांच्या ताब्यात देण्यात यावे या मागणीसाठी भिक्खू संघाच्या वतीने बुध्दगया येथे सुरु असलेल्या आंदोलनाला जाहीर पाठींबा देण्यासाठी, रमाई आंबेडकर बुध्दविहार अशोक नगर सासवड येथे, पुरंदर तालुक्यातील भिमसैनिक व बुद्धं अनुयायी यांच्या वतीने रविवार दि. ९ मार्च २०२५ रोजी सकाळी ठीक ११ वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी सर्व संमतीने वरील निर्णय घेण्यात आला आहे.

मोर्चाची सुरुवात रमाई आंबेडकर बुध्दविहार अशोक नगर सासवड येथून तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मुर्तीस पुष्प अर्पण करुन करण्यात येणार असून , अशोकनगर ते अमरचौक मुख्य बाजार पेठेतुन सदर मोर्चा सासवड नगरपरिषद येथील छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा फुले, व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन सदर मोर्चा शांततेच्या मार्गाने, डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान ते प्रशासकीय इमारत सासवड पारगाव रोड, असा जाणार असून, प्रशासकीय इमारत येथे मागणीचे निवेदन, पुरंदरचे तहसिलदार मा. विक्रम राजपूत साहेब यांच्या मार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी, व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आल्यानंतर मोर्चाची सांगता होईल , असे सर्वानुमते ठरले. यावेळी, माजी तहसिलदार सी. एम यादव, आनंदराव घोरपडे, विष्णूदादा भोसले, सुनिलतात्या धिवार, कुंडलिक बापू सोनवणे, पंढरीनाथ जाधव,सुनिल जगताप, संजीवकुमार कांबळे, डॉ. विनायक गायकवाड, सोपान रणपिसे, मनिष रणपिसे, बाळासाहेब पोळ, कैलास धिवार, दादा गायकवाड, प्रकाश जगदाळे ,अनिल मसने सर, कालीदास उबाळे, सुधीर शेलार , रमेश रणदिवे, श्रीधर गायकवाड दत्ता गायकवाड, पोपट भोसले, जे.पी. गायकवाड, सुरेश जावळे, गोविंद जगताप, योगेश शंकर घोरपडे, रमेश केदारी, मल्हारी सोनवणे, चक्रधारी सोनवणे, सुमित साबळे, बाळकृष्ण कांबळे, प्रकाश कांबळे, सुर्यकांत कांबळे, राहुल सावणे, राजेंद्र लोंढे, भगवंत सोनवणे , गणेश रणपिसे, यांसह अनेक बुध्द अनुयायी उपस्थित होते,. पुरंदर तालुक्यातील तमाम बौध्द अनुयायांनी भिम सैनिक यांनी आपली राजकीय सामाजिक संघटनेची पदे बाजूला ठेवून तथागत भगवान गौतम बुद्ध यांचे अनुयायी व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे भिम सैनिक म्हणून या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहनही कृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# कमलाकर सोनकांबळे यांची औद्योगिक प्रशिक्षण संस्थेवर अशासकीय सदस्य म्हणून निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

गोगाव ता अक्कलकोट येथील उप सरपंच सिध्दार्थ सोशल फाऊंडेशनचे मुख्य प्रवर्तक तथा दैनिक यश सिध्दि न्यूजचे संपादक कमलाकर सोनकांबळे यांची श्री स्वामी समर्थ औद्यागिक प्रशिक्षण संस्था आय टी आय च्या व्यवस्थापन समितीवर अशासकीय सदस्य म्हणून निवड झाली आहे .

कमलाकर सोनकांबळे हे अक्कलकोट तालुक्याचे लोकप्रिय आमदार सचिन दादा कलशेट्टी यांचे ते निकटवर्तीय कार्यकर्ते आहेत . कमलाकर सोनकांबळे हे आपल्या सिद्धार्थ सोशल फाऊंडेशन च्या वतीने अक्कलकोट तालुक्यात खुप चांगले काम करतात रोजगार निर्मिती महिला साठी स्वयमं उद्योग सम्यक दृष्टी ठेऊन समाजा मध्ये कामे करतात यूवकाना उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करत आहेत यूवक व्यवसाय ही वृत्ती ठेऊन उद्योगाकडे मार्गक्रमण झालं पाहिजे या सर्व कामाचा लेखा जोखा पाहुन त्यांची निवड झाली आहे . या निवडी बद्दल आमदार सचिन कलशेट्टी , सागर कलशेट्टी , मिलन कलशेट्टी , मधुकर सुरवसे , पत्रकार दादासाहेब बनसोडे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव अरोटे , रिपाईचे तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे , प्रदीप जगताप एस के गायकवाड आदिनी केले आहे.

### भारतीय बौद्ध महासभा व वंचित बहुजन आघाडी यांचे आंदोलन

### जिल्हाधिकाऱ्यांना दिले विविध मागण्यांचे निवेदन

# बौध्द गया येथील महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : सम्राट अशोक ह्यांनी इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात महाबोधी महाविहाराचे बांधकाम केले. तथागत बुद्धाला ज्या बोधीवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली तो बोधीवृक्ष याच महाबोधी महाविहार परिसरात आहे. त्यामुळे देशातील नव्हे, तर जगभरातील बौद्ध अनुयायी भिक्खू आणि पर्यटक या स्थळाला भेट देतात; मात्र या महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन आजही बौद्धांच्या ताब्यात नाही. महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, यासाठी १९९२पासून आंदोलन होत आहेत. तरी सुद्धा महाबोधी विहार व्यवस्थापन कायदा बदलण्यात आला नाही. त्यामुळे पाच हिंदू धर्मीय ह्यांचे प्राबल्य असल्याने बौध्द गया येथील






महाविहार येथे पंडे आणि ब्राम्हणवादी पुजा आणि कर्मकांड करीत असतात. त्यामुळे ज्या रूढी परंपरा ह्यांना तथागत गौतम बुद्ध ह्यांनी नाकारले तीच कर्मकांड येथे सुरू आहेत.

जागतिक वारसा म्हणून मान्यता प्राप्त बौध्द गया येथील महाविहार व्यवस्थापन कायदा तातडीने बदलण्यात यावा अशी आमची मागणी आहे. याकरीता सदर आंदोलन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू ड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शन व आवाहनानुसार तसेच भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भिमराव आंबेडकर ह्यांचे पुढाकाराने तसेच समता सैनिक दल व विविध बौद्ध संघटना यांच्यावतीने १२ मार्च रोजी देशभरातील बौद्धांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भारतीय बौद्ध महासभा व वंचित बहुजन आघाडीच्यावतीने संयुक्तरित्या आंदोलन करण्यात आले

यात खालील मागण्या राष्ट्रपती यांच्याकडे जिल्हाधिकारी मार्फत निवेदन देण्यात आले

१. महाबोधी महाविहार (बोधगया, बिहार) हे पवित्र बौद्ध धर्मस्थळ असून, बोधगया महाविहार कायदा १९४९ चा अन्यायकारक कायदा रद्द करावा.

२. बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय बौद्धांना सोबत घेऊन बौद्धांच्या ताब्यात द्यावे.

३. जागतिक वारसा अबाधित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात विशेष विकास निधी आणि सुविधा तात्काळ देण्यात याव्यात.

आपला देश स्वातंत्र्य झाल्यावर २६ जानेवारी १९५० पासून घटना लागू झाली आहे. त्यावेळी भारतीय राज्यघटनेचे कलम १३ नुसार घटना लागू होण्यापूर्वी केलेले सर्व कायदे आणि नियम निरस्त केले आहेत. मात्र तरी देखील देशात १९४९ चा नियमबाह्य कायदा लावून बौध्द समूहाचे धार्मिक अधिकार काढून घेण्यात आले आहेत.

आपण देशाच्या प्रमुख आहात, याकरीता केंद्र सरकार आणि बिहार सरकारने आपले विशेष अधिकार वापरून १९४९ चा कायदा दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात यावा. म्हणून निवेदन देण्यात आले

# शासकीय मुलींचे वस्तीगृह येथे महिला दिन साजरा

## हक्क, अधिकारांची जाणिव : विविध भूमिका साकारल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : शहरातील किंवा येथी मागासवर्गीय मुलिंचे शासकीय वस्तीगृह नविन येथे अत्यंत थाटात आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी वस्तीगृहात राहणारे सर्व मुलिंनी विविध उपक्रम राबवून महिला दिन साजरा केला.

यावेळी प्रभारी गृहपाल उज्वला तिरपुडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्जलन करून राजमाता जीजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माता रमाबाई आंबेडकर तसेच राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रतीमांचे पुजन करण्यात आले.





कार्यक्रमात स्त्रीशक्ती आणि महिलांचे महिलांचे विविध क्षेत्रा-तील योगदान यावर भाषणे, कविता सादरीकरण करण्यात आले. काही विदयार्थीनींनी महिलांचे हक्क, समानता आणि सशक्तीकरण यावर आपले नृत्य आणि कविता सादर केल्या.

कार्यक्रमातील खास आकर्षण म्हणून सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, महाराणी लक्ष्मीबाई, राजमाता जिजाऊ, किरण बेदी यांच्या भूमिका साकारल्या वेशभुषा करण्यात आल्या. हर्षा धारगावे, हिना मेश्राम यांनी महिला हक्क, अधिकार आणि जबाबदाऱ्या या विषयावर विचार मांडले.

कार्यक्रमाचे संचालन इशा सातभावे हीने केले तर आभार प्रणाली बन्सोड हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माधवी ठाकूर, प्रणा-ली बन्सोड, प्रज्ञा साखरे, अलिशा जांभुळकर, अनामिका गोडाने, शुभांगी बावणे, इशा सातभावे, पायल बरैय्या, जूही कुंडमरे यांनी मरिश्रम घेतले.

# महिलांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आदर्श घेऊन सामाजिक कार्यात अग्रेसर राहून कार्य : प्राचार्य उगले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य रंगनाथ उगले होते.व्यासपीठावर एस. एस.सी परीक्षा केंद्रसंचालक रामदास वाजे, पांडुरंग भाबड, सोमनाथ गिरी, कचेश्वर शिंदे, विद्या ठाकरे, पोलिस पाटील रामदास वारुंगसे, वरिष्ठ लिपिक राणी शिंदे, रोहिणी भगत आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते क्रांतीज्योती फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . प्रातिनिधिक स्वरूपात स्त्री शिक्षिका व मुलींचा सत्कार करण्यात आला.

### डुबेरे येथील जनता विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन




विद्यालयाचे प्राचार्य रंगनाथ उगले म्हणाले की, सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया घातला. मुलींना शिक्षणाची द्वारे त्यांच्यामुळे खुली झाली आहे. त्यांच्यामुळेच आज मुली शिक्षण घेत आहे.शिक्षण घेतल्यामुळे राष्ट्रपती पदापासून ते विविध पदावर महिला कार्यरत आहे.फुले यांच्यामुळेच महिलांनी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, कौटुंबिक तसेच विविध क्षेत्रात प्रगती केली आहे. त्यांचे कार्य अतुलनीय आहे म्हणून महिलांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन सामाजिक कार्यात अग्रेसर राहून कार्य करावे असे आव्हान प्राचार्य उगले यांनी केले.

सूत्रसंचालन शालेय सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर.करपे यांनी केले तर आभार सोमनाथ गिरी यांनी केले.

यावेळी डी.ए.रबडे,सुनील ससाणे, मारुती डगळे, सिमा गोसावी, सुदाम वारुंगसे, विनिता देवरे, जयश्री गोहाड, रेखा खंडीझोड, कल्पना शिंदे आद-ींसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# अहिल्यादेवी होळकर म्हणजे कर्तुत्व व दातृत्वाचा महासंगम : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या प्रशासनामध्ये दिले-ले योगदान जनमानसांमध्ये आजही रुजलेली आहे. त्यांनी सुरू केलेला सातबाराचा उत-ारा, मैलाचा दगड, बांधलेले घाट जनसेवेसाठी पाणपोया तसेच मंदिराचा केलेला जीर्णोद्धार यातून त्यांचा कर्तुत्व व दातृत्वाचा महासंगम दिसून येतो. त्यामुळे आजही त्यांचे कार्य जनतेच्या स्मरणात आहे असे गौरवोद्गार मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

अक्कलकोट येथील महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या सर्व शाखांच्या वती-ने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव व विद्यापीठाचा सहावा नामविस्त-ार दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, पर्यवेक्षक सुरेश रुगे उपस्थित होते. पुढे ते म्हणाले की, अहिल्यादेवी होळकर ह्या उत्तम प्रशासक म्हणून इतिहासात परिचित आहेत. त्यांनी आपल्या उत्पन्नातील बरासा पैसा जनतेच्या कल्याणासाठी खर्च केला. धर्मशाळा, मठ, घाट व मंदिरे बांधली, मूर्ती शिल्पकला कारागीराना उत्तेजन दिले. तसेच रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावली, हे त्यांचे ऋण जनता कधीही विसरणार नाही. डॉ.राजेंद्रसिंह लोखंडे म्हणाले की, विद्यापीठाने अल्पावधीत विद्यार्थी हिताचे कार्य केले. संशोधन क्षेत्रास गती दिली. त्यामुळे विद्यापीठ उंचीवर गेले आहे याची प्रचिती सर्वांना आली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्राध्यापिका हर्षदा गायकवाड यांनी केले तर आभार प्रा राजशेखर पवार यांनी मानले.

### विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित प्राध्यापकांचा सत्कार

**मातोश्रीगुरुबसव्वाकल्याणशेट्टीमहाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रमाधिकारी आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रा राजशेखर पवार, कृतिशील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रा डॉ बाळासाहेब पाटील, नॅक मानांकन समन्वयक आदर्श शिक्षिका प्रा. हर्षदा गायकवाड यांचा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते उल्लेखनीय कामगिरीबद्दल सत्कार करण्यात आला.**



# कळंब येथे सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : सुधाकर रणदिवे , ता. १० क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त कळंब येथील आठवडी बाजार मैदानातील माळी लॅब येथे विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ मार्गदर्शक श्री टी.जी. माळी यांच्या हस्ते सावित्रीमाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.कार्यक्रमास महात्मा फुले अर्बन क्रेडिट सोसायटी चे सचिव श्री अरुण माळी, अध्यक्ष राजेंद्र खडबडे, राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे सरचिटणीस संतोष भोजने,भरत शिंदे , धोंगडे सर, शेळके सर,शिंदे सर,भास्कर कांबळे सर, पडवळ सर, ज्ञानेश्वर तोडकर सर, धीरज दुधाळ, आकाश माळी आदि उपस्थित होते.या प्रसंगी सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कळंब येथे कार्यरत शिक्षक श्री.ज्ञानेश्वर तोडकर सर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

# डोहोळे ग्रामपंचायतीच्या वतीने महिला दिन व माझी वसुंधरा अभियानांतर्गत जनजागृती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे यांच्या वतीने जागतिक महिला दिन व माझी वसुंधरा अभियान ५.० अनुषंगाने महिला मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी माझी वसुंधरा अभियानाबाबत डोहोळे ग्राम पंचातिचे उत्तम काम असून राज्यात देखील आपण प्रथम क्रमांक मिळवावं असे भिवंडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गोविंद खामकर यांनी बोलतांना सांगितले. माझी वसुंधरा अभियान कोकण भवन कॉरडीनेटर अमोल पडळकर यांनी माझी वसुंधरा अभियान बाबत माहिती सांगीतली व आपल्या ग्रामपंचायतिचे महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक कसे येईल बाबत माहिती सांगीतली.तर सामाजिक कार्यकर्ते मनोहर ठाकरे यांनी जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना मार्गदर्शन केले.तर



कवी मिलिंद जाधव यांनी जिजाऊ सावित्री ,रमाई या कविता सादर करून जनजागृती केली. तर आदेश जाधव यांनी स्त्री पुरुष समानतेबद्दल महिलांना मार्गदर्शन केले. तर उपस्थित महिलांनी विविध विषयावर गाणी सादर करून प्रबोधन केले.तर डोहोळे ग्रामपंचायतच्या वतीने

माझी वसुंधरा अभियानांतर्गत विविध पोस्टर प्रदर्शन मधून सामाजिक संदेश देण्यात आला. ओला सुका कचरा वापर बाबत, प्लास्टिक बंद करून कापडी पिशवी वापर,वृक्षलागवड बाबत घेतलेली शपथ पूर्तता केली सेल्फी पॉईंट वर सेल्फी घेतल्या.तसेच घरातील ई कचरा ग्रामपंचायत मार्फत नियोजित ई कचरा संकलन केंद्रात जमा केले. तसेच हरित वाहतुक बाबत देखील जनजागृती करण्यात आली. माझी वसुंधरा अनुषंगाने प्लास्टिक बंदी वरील पथनाट्य,जंगल वाचवा या थीम वर नृत्य तसेच पाणीशुद्धीकरण व त्याचा पुन:वापर वाबत कार्यक्रम घेण्यात आले.स्त्री भ्रूण हत्या,महिलांच्या विविध योजना याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी गटविकास अधिकारी गोविंद खामकर,माझी वसुंधरा अभियान कोकण भवन कॉरडीनेटर अमोल पडळकर,विस्तार अधिकारी सुधाकर सोनावणे, ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे ,सरपंच सुमन वाघे, उपसरपंच दिनेश ठाकरे, तर सदस्य उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डोळे ग्राम पंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे आभार ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांनी केले . तर सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था,अक्कलकोट संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर उपस्थित होते.

कार्यक्रम प्रसंगी बोलताना मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, सावित्रीबाई फुले यांनी तत्कालीन सनातनी लोकांची दहशत सहन करून मोठ्या धैर्याने मुलींना शिक्षण दिले म्हणून त्यांचा आदर्श महिलांनी घेतला पाहिजे. महिलांनी संकटाला सामोरे गेले पाहिजे, उच्च शिक्षण घेऊन निर्भीड झाले पाहिजे. आपले अंगभूत कौशल्य वापरून शौर्याने दुर्जनांचा सामना केला पाहिजे, तरच अभिनव समाजाची निर्मिती होईल.

प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. स्वागत मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्राध्यापिका हर्षदा गायकवाड यांनी केले तर आभार प्रा राजशेखर पवार यांनी मानले.

### तहसीलदार विनायक मगर यांची प्रमुख उपस्थिती

### सावित्रीबाई फुले यांच्यामुळे स्त्री पुरुष समानता आली

**सावित्रीबाई फुले यांच्या विचारानुसार महिलांनी परिवर्तनशील विचार स्वीकारले आहे. समाजात कृतिशील बदलाचे वारे वाहत आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष समानता आली आहे. असे तहसीलदार विनायक मगर यांनी यावेळी सांगितले.**

# श्री माताजी निर्मलादेवी प्रशालेत महिला दिनानिमित्त महिलांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री रुक्मिणी विद्यापीठ संचलित श्री माताजी निर्मलादेवी प्राथमिक उच्च प्राथमिक विद्यामंदीर शाळेच्या वतीने जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या व. सौ.धनश्रीताई घाडगे व अध्यक्षस्थानी मा.सचिवा सौ सुनेत्राताताई पवार होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. राजमाता जिजाऊ ,झाशीची राणी, राणी चन्नम्मा यांच्या वेशभूषा केलेल्या मुलींनी स्वगत सादर केले.



प्रशालेचे माजी विद्यार्थी डॉक्टर विनय ननवरे, एमडी व डॉक्टर पुजा ननवरे ,बीडीएस यांच्या मातोश्री सौ कमल लक्ष्मण ननवरे ,श्री स्मरण उद्योग समूहाचे ऋत्विक लिंगे यांच्या मातोश्री सौ. राणी सुनील लिंगे ,रेल्वे अभियंता असण-ारे अक्षय मुळे यांच्या मातोश्री सौ शोभा श्रीहरी मुळे व दुबई येथे अभियंता असणारे परितोष निंबाळकर यांच्या मातोश्री सौ अंजली दिलीप निंबाळकर या कर्तुत्ववान मातांचा सन्मान सन्मानपत्र देऊन करण्यात आला.

यावेळी बोलताना व .धनश्र-ीताई म्हणाल्या, रवींद्रनाथ टागोर यांनी महिलांबाबत एका कवितेत म्हटले आहे 'अर्धे विश्व महिला आहेत, तर उर्वरित अर्धे विश्व महिला मुळे आहे' भारतीय संस्कृतीत महिलांना मानाचे स्थान आहे. स्त्री व पुरुष एकाच रथाची दोन चाके आहेत. बदलत्या समाज व्यवस्थेत कौटुंबिक अत्याचार कमी झाले तरी अन्य ठिकाणचे वातावरण विचार करायला लावणारे आहे. संसारात, समाजात स्त्री व पुरुष या दोघांनी विवेकाने वागले पाहिजे .यावेळी त्यांनी महिला विषयक कायद्याची माहिती दिली व मनाचा, विवेकाचा कायदा सर्वोच्च असल्याचे सांगितले.

मा. सचिवा सुनेत्राताई यांनी आज चार मातांचा सन्मान झाला आहे या ठिकाणी ४० मतांचा सत्कार करण्याचे भाग्य आम्ह-ाला लाभले पाहिजे असा आशावाद व्यक्त केला.

यावेळी मुख्याध्यापक श्री संतोष कवडे, श्री लक्ष्मण ननवरे, सुवर्णा जगद-ाळे यांनी मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन श्री अशपाक मुजावर यांनी केले. आभार श्री आलनदीप टापरे सरांनी मांडले.